दैनिक नांदेड एकजूट

निःपक्ष व निर्भीड बातमी देणारे एकमेव दैनिक

नांदेड, बुधवार, दि.१४ जुलै २०२१

# शिक्षणाचे पूर्णत्व आणि संत साहित्य

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आणि श्री क्षेत्र आळंदी देहू विकास परिसर समिती यांचे वतीने आयोजित पहिली भारतीय संत साहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या माध्यमातून या विषयावर प्रकाश टाकण्याचे काम होत आहे. ही अतिशय आनंदाची बाब आहे. या परिषदेचा मुख्य उद्देश, भारतीय संत साहित्याचा उच्च शिक्षणात समावेश करण्याची गरज, असा आहे. उपरोक्त विषयाचा शासनाने गांभीर्यपूर्वक विचार करून शिक्षण व्यवस्थेत योग्य तो बदल केला, तर नक्कीच भावी पिढीची जीवनपद्धती सुधारेल असे दिसून येते. मा. राहुल कराड यांनी अतिशय दूरदृष्टीपूर्वक या परिषदेचे आयोजन करून सर्वांना एक चांगली संधी प्राप्त करून दिली आहे.

शिक्षण प्रणालीमध्ये संत साहित्याचा अंतर्भाव व्हावा, या विषयावर चर्चा करतांना प्रथम संत साहित्याचे व्यापकत्व समजावून घ्यावे लागेल. संत साहित्याने किंवा संत विचाराने महाराष्ट्राला काय दिले, या प्रश्नाचे उत्तर मात्र या साहित्याने काय दिले नाही असेच द्यावे लागेल. मराठी भाषेच्या नगरीत ब्रह्मविद्येचा सुकाळ करून ज्ञानेश्वर माऊलींनी भागवत संप्रदायाला अध्यात्मनिष्ठ मानवतावादाची बैठक मिळवून दिली आणि सकल संतांनी आपल्या अभंगादी साहित्यातून तो वैश्विक मानवतावाद संपूर्ण जगाला दिला. भाषेच्या मर्यादेमुळे जरी ते महाराष्ट्रापुरते मर्यादित राहिले तरी विचार तत्त्वाच्या अभिव्यक्तीने ते वैश्विक ठरले आहे. विचारांचे ओज, रचनेचा प्रसाद आणि सुबोधाची माधुरी यामुळे संत साहित्य हे जसे एकीकडे देशियेचिये लावण्य ठरले आहे, तसेच भक्तितत्त्वाबरोबर, मानवी जीवनमूल्ये विज्ञानदृष्टी, पर्यावरण जागृती, सामाजिक नैतिकता, विकासात्मक दृष्टीकोन, विवेक प्रामाण्यवाद, सामाजिक एकरूपता, लोकसंग्रहात्मक भावना अशा विविध दृष्टीकोनातून संत साहित्याने सामाजिक जाणिवा जपल्या आहेत. भक्ति, नीति, श्रध्दा, सत विचारदर्शन हा तर संत साहित्याचा महत्त्वाचा भाग आहे. पण ज्या मानवी मूल्यांमधून सामाजिक जाणिव उभे राहिले आणि समृध्द होते असे प्रवृत्तीवादी दर्शन संत साहित्यातून ठायी ठायी आढळते. अशी अनेक उदाहरणे संत साहित्यातून देता येतील. ज्ञानदेवांनी चौथ्या अध्यायात म्हटले आहे.

आणि उदयास्तायेनि प्रमाणे ।
जैसे न चालता सूर्याचे चालणे ॥

सूर्य उदयाला येतो आणि अस्ताला जातो त्यामुळे तो एका प्रमाणावरून चाललेला भासतो. पण तो चालत नाही तर सूर्य स्थिरच आहे. पृथ्वी त्याचा भोवती फिरते आहे. कोपर्निकसने सुध्दा सूर्य पृथ्वी भोवती फिरतो आहे. असे म्हटले होते पण ज्ञानदेवांनी त्याचे ही मत केव्हाच खोडून काढले आहे. आज आदर्श नगररचनेची संकल्पना विकास प्रक्रियेतील महत्त्वाचा भाग बनली आहे पण ज्ञानदेवांनी

नगरेचि रचावी।
जलाशये निर्मावी।
महावने लावावी, नानाविध।।

असे ठामपणे मांडून नगरविकासाच्या संकल्पनेचाही एका अर्थाने पाया घातला होता. जीवन जगताना निसर्गात वावरतांना अवती भोवती दिसणारे जाणवणारे पर्यावरणाचे घटक सर्वांच्या परिचयाचे आहेत. वृक्ष वल्ली, डोंगर, नदी, फळे, फुले, पशु, गाई, गुरे, वने, अरण्ये, पाऊस, ह्या पर्यावरणाच्या घटकांना कधी उपमा, कधी रूपक, कधी सिद्धांत तर कधी दृष्टांत अशा स्वरूपात आपल्या वाङ्मयातून ठायी ठायी मांडून पर्यावरणाची नवी दृष्टी दिली आहे. ज्ञानदेवांनीच म्हटल्याप्रमाणे,

## भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद



डॉ. रामचंद्र देखणे

जयाचेनि उजाळे, उघडती बुद्धीचे डोळे

बुद्धीचे डोळे उघडणारे ज्ञानही दिले आणि उघडविणारे विज्ञान ही दिले. परंतु ह्या भूमिकेतून संत साहित्याकडे पाहिले गेले नाही. धार्मिक, आध्यात्मिक, भक्ति प्रधान म्हणूनच ते प्रामुख्याने मांडले गेले. शिक्षण हे कधी एकांगी नसते. ते सर्वस्पर्शी आणि सर्वदर्शी असते. व्यक्तीच्या बौद्धिक, मानसिक व सांस्कृतिक विकासाला कारण होणारे जे ज्ञान ते शिक्षण होय, अशी शिक्षणाची व्यापक अर्थाने व्याख्या केली जाते. ज्यामुळे हात हरकामी, बुध्दी सर्वगामी आणि हृदय सर्व प्रेमी होते. ते खरे शिक्षण होय. त्यासाठी महात्मा गांधींनी शिक्षणामध्ये नीतिप्रधान सिद्धांत आवश्यक असल्याचे म्हटले आहे. तर थोर शिक्षणतज्ञ आणि भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी व्यक्तीचा आणि समाजाचा सर्वांगिण विकास होण्यासाठी शिक्षणात नैतिक सदाचरणाचा भाग आवश्यक असल्याचे म्हटले आहे. आज उच्च शिक्षणात शिक्षणाच्या अनेक विद्या शाखा उघडल्या आहेत. अभ्यासक्रमानुसार शिक्षण दिले जात आहे. पण शिक्षणातून मूल्याधिष्ठित नैतिकता हरवत चाललेली आहे. खूप शिकलेला माणूस हा कुटुंबापासून समाजापासून दूर दूर जातोय. आत्मकेंद्री वृत्तीने त्याच्या भावनाही थोकट होत चालल्या आहेत. बुध्दीवान माणूस भावनाशून्य असेल तर त्याची बौध्दिक वृत्ती आणि ज्ञान हे शुष्क ठरते. शिक्षण म्हणजे पूर्णत्वाचा अविष्कार परंतु जीवनमूल्यांशिवाय हे पूर्णत्व येणार नाही. आणि शिक्षण खऱ्या अर्थाने अपूर्ण राहील. संतांचे भक्तिशास्त्रही एका अर्थाने नीतिशास्त्रच आहे. मूल्यांची जाणिव करून देणे आणि ती मूल्ये जपणे हा कोणत्याही शिक्षणप्रणालीचा आत्मा आहे. हे संपूर्ण जगातील शिक्षण तज्ज्ञांनी मान्य केले आहे. तर जीवनमूल्ये मांडणे आणि जपविणे संतसाहित्याचा प्राण आहे. म्हणून आजच्या शिक्षणप्रणालीत संत प्रणित मूल्यविचारांची मांडणी झाली तरच

तस्मात ज्ञानमयो भव

ह्या योगवासिष्ठातील वचनाप्रमाणे शिक्षणाने ज्ञानमय होण्याची प्रक्रीया खऱ्या अर्थाने पूर्ण होईल.

◆◆◆

जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.

वृत्तमानस

मुंबई–पालघर, बुधवार, दि.७ जुलै २०२१

# एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणेतर्फे पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद

■ पुणे

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पहिली 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद' गुरुवार, दि. १५ जुलै २०२१ ते रविवार, दि. १८ जुलै २०२१ या कालावधीत ऑनलाइन आयोजित करण्यात आली आहे.

या परिषदेचे उद्घाटन गुरुवार दि. १५ जुलै २०२१ रोजी दुपारी २ वा. होईल. या सत्राचा विषय 'भारतीय संतसाहित्याचा उच्चशिक्षणात समावेश काळाची गरज' हा आहे. समारोपसत्र रविवार, दि. १८ जुलै २०२१ रोजी दुपारी ४.३० वा. होईल.

या चार दिवसीय सत्रामध्ये सहा सत्रे असतील.

१. संतसाहित्य - समृद्ध जीवन जगण्याचे आधुनिक शास्त्र

२. वारकरी तत्त्वाय विचार : आधुनिक की कालबाह्य

३. भारतीय संतविचाराचे खच्चीकरण इंग्रजी शिक्षणपद्धतीने केले काय?

४.संत आणि आरोग्य व्यवस्थापन

५. आमच्या तत्त्वज्ञ संतांना धार्मिक कोणी ठरविले?

६. भारतीय शिक्षण अभ्यासक्रमात भारतीय संत गौण का?

परिषदेमध्येनामवंतशिक्षणतज्ज्ञ, वारकरी संप्रदायातील कीर्तनकार, प्रवचनकार, तत्त्वज्ञ आणि संत साहित्याचे अभ्यासक आपलेविचार मांडतील.

यापहिल्याभारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष जगद्गुरु तत्त्वज्ञ संत तुकाराम महाराजांचे वंशज ह.भ.प. श्री. बापूसाहेब मोरे आणि सुप्रसिद्ध कीर्तनकार व प्रवचनकार आणि शब्दांचे निष्ठावंत वारकरी ह.भ.प. श्री. रविदास महाराज शिरसाट हे कार्याध्यक्ष म्हणून कार्य करणार आहेत.

एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांची संकल्पना आणि पुढाकार आणि विद्यापीठाचे अध्यक्ष विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या मार्गदर्शनाखाली ही परिषद संपन्न होईल. भारतीय संत साहित्यामध्ये अनेक वैज्ञानिकवतात्त्विकतथ्यांचाउल्लेख आढळतो. अर्थात भारतीय संतांना भारतीय ज्ञानपरंपरेतून उमजलेल्या अनेक शोधाबद्दल माहिती होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. अनेक पाश्चात्त्य वैज्ञानिकांच्या नावे असलेले शोध हे पूर्वी भारतामध्ये लागले असल्याचे आता अभ्यासांती आले आहे. मनोबोध, ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, भक्ती आणि श्रद्धा या सर्वांचा ऊहापोह करणारे संतसाहित्य याचा उच्चशिक्षणात समावेश होणे ही काळाची गरज आहे. हा हेतू ठेवून, चार दिवसांची ही परिषद आयोजित करण्यात आली आहे.

या परिषदेत ज्या कीर्तनकार, प्रवचनकार आणि विवेकांना सहभागी व्हायचे असेल, त्यांनी शालीकराम महाराज खंदारे मो.९८५००७४२०३, महेशमहाराज नलावडे मो.९८२२५४७७२७ किंवा रामचंद्र महाराज डोळे यांच्याशी ९३०९८२४७४० मोबाइलवर संपर्क साधून नाव नोंदणी करावी. असे आवाहन पहिल्या भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या संयोजन समितीचे समन्वयक डॉ. संजय उपाध्ये यांनी केले आहे.

जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.

**संध्याकाळ**
**मुंबई, बुधवार, दि.७ जुलै २०२१**

# उच्च शिक्षणात संत साहित्याची गरज

शिक्षण हे जीवनमूल्यांचे संवर्धन करणारे असले पाहिजे. शालेय किंवा महाविद्यालयीन अभ्यासक्रमामध्ये आवश्यक त्या सर्व विषयांचा अभ्यास करीत असताना ज्यामधून विद्यार्थ्यांच्या मनाची जडणघडण होईल. विशेषत: त्याच्या बुद्धीला आणि मनाला आनंद आणि समाधान या दोन्ही गोष्टी मिळतील अशी अभ्यासक्रमाची रचना गरजेची ठरते. आज ती नसल्यामुळेच विद्यार्थ्यांना वेगळे नैतिक मूल्यांचे शिक्षण द्यावे लागते. खरे तर शिक्षण या शब्दातच जीवनमूल्याचा अंतर्भाव होतो. परंतु सध्या काळाचा विचार करून अनेक प्रकारचे विषय अभ्यासक्रमामध्ये घुसडले जातात. विज्ञान, गणित, भूगोल, समाजशास्त्र, इतिहास हे विषय तर अनिवार्य ठरतातच. परंतु केवळ या विषयांचा अभ्यासक्रम म्हणजे शिक्षण असा जो सोयिस्कर अर्थ केला गेला आहे त्यातून जीवनासाठी शिक्षण की शिक्षणासाठी जीवन असा मूलभूत प्रश्न निर्माण होतो. हा प्रश्न थोडासा कलेसाठी जीवन किंवा जीवनासाठी कला याच पद्धतीचा म्हणावा लागतो. चांगले जीवन जगण्याकरिता शिक्षण आवश्यक ठरते. परंतु चांगले जीवन याचा अर्थ मोठ्या पगाराच्या नोकऱ्या किंवा इंजिनिअर, डॉक्टर, वकील होणे अधिकाधिक चांगल्या प्रकारचे करियर करून आपली आर्थिक स्थिती उत्तम राहील या दृष्टीकोनातून शिक्षणाकडे बघितले जाते. अशा प्रकारच्या चाकोरीबद्ध दृष्टीकोनामुळे विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने आनंद आणि समाधान मिळत नाही. या अभ्यासक्रमाच्या जोडीला जर संत साहित्याची जोड दिली तर फार मोठा परिणाम साधला जाऊ शकतो. ज्या संतांनी कधी शाळेत जाऊन शिक्षण घेतले नाही. परंतु जीवनाचे अतिशय मूलगामी तत्त्वज्ञान त्यांनी मांडले. जगण्यासाठी कशा प्रकारचे शिक्षण आवश्यक आहे हेसुध्दा त्यांनी शाळेत न जाता आपल्या अभंगांमधून आणि अनुभवांमधून सांगून ठेवले आहे. हे संत साहित्य मनाचा आणि बुद्धीचा एकत्रितपणे विचार करते. हे संत साहित्य केवळ माध्यमिक किंवा शालेय अभ्यासक्रमातच नव्हे तर अकरावी, बारावीपासून सुरु होणाऱ्या सर्व प्रकारच्या उच्च शिक्षणातही समाविष्ट केले जावे अशा प्रकारचा एक सैद्धांतिक विचार पुण्याच्या एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल कराड यांनी मांडला.

### प्रा. राहुल कराड यांचा पुढाकार

ज्या संत साहित्यातून खऱ्या अर्थाने आत्मिक समाधान प्राप्त होते या संदर्भातली पहिली भारतीय संत साहित्य उच्च शिक्षण परिषद येत्या १५ जुलैपासून चार दिवस ऑनलाईन पद्धतीने भरवली जात आहे ज्यात महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील अनेक ज्येष्ठ संत, तत्त्वज्ञ शिक्षण तज्ञ सहभागी होत आहेत. अशी परिषद भरविण्याचा विचार एका प्रथितयश विद्यापीठाच्या कार्याध्यक्षांच्या मनात यावा ही गोष्टसुद्धा खूप महत्त्वाची मानली पाहिजे. शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देतात. त्या संधीचा विद्यार्थ्यांना प्रभाविपणे उपयोग करता आला पाहिजे. केवळ आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञानाचा भडीमार असलेला अभ्यासक्रम जगण्यासाठी भलेही आधार ठरू शकेल. परंतु आयुष्यभर समाधान हवे असेल तर बुद्धीला या तांत्रिक ज्ञानाबरोबरच सात्त्विक संस्कारांचीदेखील गरज भासते. संत साहित्यामध्ये असे अनेक विचार आहेत की, ज्यांनी व्यष्टी आणि समष्टी म्हणजेच व्यक्ती आणि सृष्टीचा समग्र विचार केलेला पाहायला मिळतो. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी', असे म्हणणारे तुकोबा किंवा प्रपंच करावा नेटका असा विचार देणारे समर्थ रामदास, 'ओम नमोजी आद्या वेद प्रतिपाद्या, जय जय स्वसंवेद्या आत्मरूपा' असे तत्त्व मांडणारे ज्ञानोबा, नगरेचि रचावी। जलाशये निर्मावी। महावने लावावी। नानाविधे। हाच विचार ज्ञानोबांच्याच अभंगांमधून जेव्हा मांडला जातो. तेव्हा या सृष्टीच्या रचनेमध्ये किती विविधता आहे आणि ती कशी जपली पाहिजे याचेच ते मार्गदर्शन करतात. आत्मतत्त्व साठवलेली ही सृष्टी केवळ विज्ञानाच्या अंगाने समजून घेता येणार नाही तर त्याकरिता मनाने तिच्याशी एकरूप व्हावे लागेल. संतांचे अभंग हे आपल्याला सृष्टीजवळ घेऊन जातात. म्हणूनच डॉ. जगदिशचंद्रांसारखा शास्त्रज्ञ वनस्पतीशास्त्राचा अभ्यास करत असताना झाडांना किंवा फळाफुलांनाही मन किंवा संवेदना असल्याचा शोध लावतो त्यावेळी संत साहित्याने हाच विचार किती प्राचीन काळी केला होता हे स्पष्ट होते. अशा अतिशय महत्त्वाच्या विषयावर राहुल कराड यांनी घेतलेला पुढाकार अभिनंदनीय आहे. परंतु केवळ परिषद घेऊन थांबू नये तर त्यांच्याच विद्यापीठातून उच्चशिक्षणात संत साहित्याचा अंतर्भाव कसा करता येईल त्याची सूत्रबद्धरचना करावी त्यातून त्यांनी मांडलेला हा सैध्दांतिक विचार शिक्षणाला समृध्द करणारा राहील.